RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक २७(२)] शुक्रवार, डिसेंबर २६, २०२५/पौष ५, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.**—महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. | **पृष्ठे १–३** |

**ग्राम विकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१,

दिनांक २६ डिसेंबर २०२५.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIV OF 2025.**

*AN ORDINANCE*

**FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.**

**सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६२ चा महा. ५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेतः-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ याच्या कलम १४ मध्ये, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतीलः- १९६२ चा महा. ५.

"(२) राज्य शासन, अशा निवडणुका घेण्याकरिता नियम करील आणि अशा निवडणुका, त्या नियमांनुसार घेण्यात येतील.

(३) नामनिर्देशन पत्रे स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल आणि त्यास कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.".

## निवेदन

भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४३ट आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम ९अ मध्ये अशी तरतूद केली आहे की, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या सर्व निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्याचे आणि निवडणुका घेण्याचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण राज्य निवडणूक आयोगाकडे निहित असेल.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम १४(२) मध्ये अशी तरतूद केली आहे की, राज्य शासन, नामनिर्देशन पत्रे स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयाकडे अपील करण्यासह अशा निवडणुका घेण्याकरिता नियम करील. त्यानुसार, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निर्वाचक गट व निवडणूक घेण्याबाबत) नियम, १९६२ याच्या नियम २० आणि महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेण्याबाबत) नियम, १९६२ याच्या नियम १९अ यांमध्ये, नामनिर्देशन पत्रे स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल करण्याबाबत आणि जिल्हा न्यायालयाने, अशा अपिलांची सुनावणी दररोज घेणे आणि शक्य असेल तितक्या शीघ्रगतीने ते निकालात काढणे आवश्यक असल्याबाबत तरतूद केलेली आहे.

**३.** राज्य निवडणूक आयोगाने, राज्य शासनाला असे कळविले आहे की, विविध जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशी अपिले प्रलंबित आहेत आणि अशी अपिले केव्हा निकालात काढण्यात येतील हे देखील निश्चित नाही. आयोगाने असे देखील कळविले आहे की, निवडणुकीसंबंधीच्या बाबींमध्ये न्यायालयांनी हस्तक्षेप करण्यास रोध असल्याची तरतूद भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४३ण मध्ये केली आहे. म्हणून, आयोगाने, कालबद्ध रीतीने निवडणुका घेण्याच्या दृष्टीने, अशा अपिलांशी संबंधित असणाऱ्या तरतुदी वगळण्याकरिता वर निर्दिष्ट केलेल्या नियमांमध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविलेला आहे. म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १४ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

**४.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २५ डिसेंबर २०२५.

**आचार्य देवव्रत,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एकनाथ डवले,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.